# भेटवृतांत







इंजिनिअर्स फोरम नागपूर तर्फे आयोजित, आनंदवन (कुष्ठरोगी प्रकल्प, हेमलकसा (लोक बिरादरी प्रकल्प व मार्कंडेश्वर देवस्थान भेट)

इंजिनिअर्स फोरम नागपूर तर्फे दोन दिवसीय भेटीचे आनंदवन (कुष्ठरोगी प्रकल्प, हेमलकसा (लोक बिरादरी प्रकल्प व मार्कंडेश्वर देवस्थान) येथे दिनांक व 16 फेब्रुवारी, 2014 ला भेट आयोजित करण्यात आली होती. एकूण 60 अभियंत्यांनी या भेटीस येण्याचे आश्वासित केले. त्यानुसार 35 सिटर लक्झरी बस, एक तवेरा, एक स्कॉर्पिओ (पंतप्रधान ग्राम सडक योजना तर्फे) ठरविण्यात आली. पंरतु काही अपरिहार्य कारणास्तव शेवटच्या क्षणाला 16 सिटस् कमी झाल्या व 44 जणांनी या भेटीत सहभाग घेतला.

काही अभियंता इंडियन वॉटर वर्कस् असोसिएशन शंकरनगर येथील कार्यालयात तर काही अभियंते छत्रीपतीनगर बसस्थानक येथे ट्रिपला जाण्याकरिता दिनांक 15.2.2014 ला सकाळी 7.30 वाजता उपस्थित झाले. आम्ही सर्व जण सकाळी 9.30 च्या सुमारास आनंदवन वरोरा येथे पोहचलो. तेथे अभियंता सराफ, कार्यकारी अभियंता (एम.एस.इ.डी.सी.एल) व सहका-यांनी स्वागत केले. त्यानंतर सर्वांची चहा नाश्त्याची कॅंटिनमध्ये व्यवस्था करण्यात आली होती. त्याचा सर्वांनी आस्वाद घेतला व लगेच आनंदवनातील कुष्ठरुग्णांचा दवाखाना, वर्कशॉप, समाधीस्थळ, स्वरानंदवन ऑर्केस्ट्रा, अंध व मुकबधिरांची शाळा, गो शाळा, विविध वस्तू निर्मिती भांडार, संधिनिकेतन कार्यशाळा, कृषि विभाग, छापखाना, वस्त्रोद्योग अशा विविध उद्योगांचे जाळे पाहल्यानंतर लक्षात आले की, एवढे मोठे प्रचंड कार्य स्व.बाबा आमटे व त्यांच्या सहकारी यांनी कसे उभे केले असेल ? ते पाहून डोळ्याचे पारणे फिटले.

आनंदवनातील श्री. देवघरे (9011094611) यांनी संपूर्ण भेटीदरम्यान मार्गदर्शकाची भूमिका बजावली. त्यानंतर विकास आमटे यांची दुपारी 12.15 ला त्यांचे भेट कक्षामध्ये मुलाखतीची व्यवस्था करण्यात आली होती.

सर्व अभियंत्यांना त्यांनी आपल्या कक्षामध्ये आनंदवनाचा संपूर्ण वृत्तांत कथन केला. सर्वांशी सुसंवाद साधला. अभियंत्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्यानंतर इंजिनिअर्स फोरम नागपूरचे अध्यक्ष अभि. एस. डी. शिंदे यांचे हस्ते डॉ. विकास आमटे यांचा शाल श्राफळ देवून सत्कार करण्यात आला व त्यांचे या अतुलनीय कार्याला इंजिनिअर्स फोरम तर्फे सहायता निधीचे स्वरुपात रु. 51,000 चा धनादेश प्रदान करण्यात आला व सर्व अभियंत्याद्वारे एकत्रित धनराशी रु. 5000 सुद्धा प्रदान करण्यात आली.

त्यानंतर तेथिल कुष्ठरोग्यांनी पिकविलेली अन्नधान्य, फळभाज्या द्वारा त्यांचेहस्ते तयार करण्यात आलेला स्वयंपाकाचा आस्वाद घेवून त्यांचा निरोप घेवून चंद्रपूरकडे रवाना झालो. सौ. घोडेस्वार कार्यकारी अभियंता (एम.एस.इ.डी.सी.एल) चंद्रपूर व त्यांचे सहकारी यांनी प्रवासामध्ये टरबूजज्यूस ची व्यवस्था केली होती. श्री हिवरकर, का. अभियंता (एम.एस.इ.डी.सी.एल) व त्यांचे सहकारी यांनी समोसा, चहाची सर्वांकरिता व्यवस्था तयार ठेवली होती. त्यांना व त्यांचे सहकार्यांना धन्यवाद देवून हेमलकसाकडे वाटचाल केली. रात्रौ 8.30 वाजता हेमलकसा येथे पोहचलो. आमटे परिवारातील सदस्यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यांनी आमची राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था करुन ठेवली होती.

फ्रेश ताजेतवाने झाल्यांनतर तेथील जेवणाचा आस्वाद घेतला व लगेच जेवणानंतर तेथील कार्यकर्त्यांनी डॉ. प्रकाश व मंदा आमटे यांचे आदिवासी क्षेत्रातील कार्यावर आयोजित डॉक्युमेंटरी फिल्मचे आयोजन केले होते. एका प्रेक्षक गृहामध्ये खुर्च्याची व्यवस्था करण्यात आली होती. सर्वांनी ती फिल्म पाहली व सर्व अभियंत्यांना लोक बिरादरी प्रकल्पाची कल्पना आली. शैक्षणिक, उद्‌बोधक व अतिशय प्रभावी अशी तयार करण्यात आली होती. ती पाहून सर्वजण प्रभावित झाले. रात्रीला झोपण्यापूर्वी सर्वांना दि.16 फेब्रुवारी, 2014 ची योजना सांगण्यात आली. सकाळी 7.30 ला सर्वांनी नाश्त्याकरिता कॅंटिनमध्ये तयार राहण्यास सांगितले व सकाळी 8.00 ला डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आपटे यांचे वास्तव्याचे ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले व त्यांनतर सर्वजण झोपी गेले.

दि. 16 तारखेला पहाटेपासून सर्वजण लगबगीने स्नान आटोपून 7.30 पर्यंत कँटिनला जमा झाले. सर्वानी नाश्ता, चहा घेवून सभेच्या ठिकाणी सर्वांनी आपले आसन ग्रहण केले.

सकाळी ठीक 8.00 वाजता डॉ. प्रकाश आमटे यांचे पत्नीसमवेत आगमन झाले. इंजिनिअर्स फोरम नागपूर तर्फे अभि. एस. डी. शिंदे यांचेहस्ते शाल–श्रीफळ देवून स्वागत करण्यात आले व लोक बिरादरी प्रकल्पाला सहायता निधी म्हणून रु. 51,000/– चा धनादेशसुद्धा प्रदान करण्यात आला. तसेच तेथील आमचे उत्कृष्ट व्यवस्थेकरिता रु.25,000/– स्वतंत्ररित्या देण्यात आले. अभि. एस. डी. शिंदे सरांनी सर्व अभियंत्यांचा डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आमटे यांचेशी परिचय करुन दिला. दरम्यान अल्पशा पावसाने सुद्धा आमचे स्वागत झाले. त्यानंतर डॉ.प्रकाश आमटे यांनी लोक बिरादरी प्रकल्पाची विस्तृत माहिती दिली. संपूर्ण हेमलकसा वृत्तांत कथन केला. ते ऐकून अंगावर शहारे आले. त्यात त्यांचा त्याग व मेहनत दिसून येत होती. तेथे वास्तव्यास असलेल्या 800 आदिवासी मुलामुलींचे वसतीगृहासाठी जवळपास रु. 11,000/– प्रतीदिन खर्च येतो. अशी माहिती मिळाली. प्रकल्पातील छोट्या मुलांसाठी भेट म्हणून 50 चादरी देण्यात आल्या.

हसरे प्रसन्न व्यक्तीमत्व दोघांचीही जोडी एक दुजे के लिए असल्यासारखी वाटली. ज्वलंत त्यागमूर्ती, सर्वांना हसत खेळत सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

त्यानंतर डॉ. प्रकाश आमटे यांनी प्राणिमात्रांशी मैत्री कशी असावी? त्याचे प्रात्यक्षिक दाखवून सर्वांना चकित केले. संपूर्ण प्राणी संग्रहालयात फेरफटका मारला. तेव्हा आम्ही सर्व अचंबित झालो. हाता–खांद्यावर खेळणारा वाघ, साप, अस्वल, मगर, कासव... किती म्हणून सांगावे. पहावे ते नवलच. प्रेम द्या प्रेम घ्या हा संदेश या सार्वातून मिळत होता. त्यानंतर श्री. जगन मचकले (7588772849) यांनी संपूर्ण परिसर फिरवून लोक बिरादरी आश्रमशाळा, लोक बिरादरी दवाखाना, वन्यप्राण्यांचे अनाथालय (आमटेज् ॲनिमल आर्क) लोक बिरादरीचे छायाचित्र प्रदर्शनी, या सर्वांची माहिती दिली. हे ठिकाण म्हणजे खरेच माडिया गोंड आदिवासींचे आशास्थान व त्याचे सर्वेसर्वा म्हणजे आमटे कुटुंब याची संपूर्ण कल्पना आली.

दुपारच्या सत्रात दुपारी 12.30 वाजता डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदा आमटे कुटुंबियासमवेत सर्व अभियंत्यांनी जेवणाचा आस्वाद घेतला. ग्रुप फोटो सेशन झाले. त्यानंतर त्यांचा निरोप घेवून पुढील प्रवासाला सुरुवात केली.

मार्कंडेश्वर देवस्थानाला जाताना मध्ये आलापल्ली येथे अभियंता हिवरकर व सहकारी यांनी चहा, बिस्किट व अल्पशा विश्रांतीची व्यवस्था करुन ठेवली होती.

अल्पशा विश्रांतीनंतर लगेचच मार्कंडेश्वरकडे रवाना झालो. तेथे दुपारी 3.30 पोहचलो. सर्वांनी छान दर्शन घेवून वैनगंगेच्या तिरावरील निसर्गरम्य ठिकाणाचा मनमुराद आनंद लुटला. संपूर्ण दृश्य डोळ्यांमध्ये व कॅमेऱ्यामध्ये साठविले. पुरातन बांधकाम कौशल्याचे प्रतिक म्हणजे मार्कंडेश्वर देवस्थान. वास्तूशास्त्र व तेथील शिल्पकलेचा नमूना म्हणजे मार्कंडेश्वर देवस्थान होय. संपूर्ण परिसर फिरुन झाल्यावर सायंकाळी 6.30 वाजता परतीच्या प्रवासाला सूरुवात झाली. सर्वजण थकून गेलेले असल्यामुळे प्रवासात छान झोप लागली. भिवापूर येथे गरमागरम भजे व चहावर ताव मारला. सर्व अभियंत्यांच्या चेहऱ्यावर दौरा यशस्वी झाल्याच्या आनंदाच्या छटा दिसत होत्या. अतिशय सुंदर नियोजन, संघटन चातुर्य, पूर्वतयारी, दांडगा संपर्क, वेळेचे नियोजन व पुरेपूर आनंद देण्याचे दृष्टीने सततचे प्रयत्न यामुळे ही सहल शैक्षणिक, उद्‌बोधक व अवर्णनीय ठरली. संपूर्ण सहलीचा आनंद घेवून तृप्त मनाने रात्री 10.30 वाजता सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला.

अनुवाद व कल्पना –
इंजि. संजय खोंडे (डब्लु.आर.डी.)

000







